महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

दूरध्वनी क्र ०२२-२२८५०५९५ Email ID : amol.sakharkar@nic.in

---

क्र.झेमक-२०२१/प्र.क्र.६४/नों.शा. दिनांक:- २७ ऑक्टोबर, २०२१

# (Tender Notice)
# दरपत्रकाबाबतची निविदा सूचना

**विषय -: कृषि व पदुम विभागासाठी एक वर्षाच्या कालावधीकरिता दोन हेवी डयुटी झेरॉक्स मशिन भाडेतत्वावर घेण्याबाबत..**

कृषि व पदुम विभाग (खुद्द), मंत्रालय, मुंबई यांच्या कार्यालयीन कामकाजासाठी व मा.मंत्री (कृषि) यांचे कार्यालयीन कामकाजासाठी प्रत्येकी एक झेरॉक्स मशिनचा एका वर्षाच्या कालावधीसाठी **"प्रती प्रत दर** (Per Copy Rate)" या प्रमाणे भाडेतत्वावर स्थापित करावयाचे आहे. या करीता खाली नमुद अटी व शर्तीनुसार मोहोरबंद दरपत्रक मागविण्यात येत आहे.

३. **या विभागाकडे दरपत्रक सादर करताना खाली नमूद केलेल्या अटी व शर्ती विचारात घेऊन दरपत्रक सादर करण्यात यावे :-**

१. **एक वर्षाच्या कालावधीकरिता** प्रति मिनिट जास्तीत जास्त पाठपोट प्रती देणारे दोन ड्युप्लेक्स हेवी डयुटी झेरॉक्स मशिन **"प्रति प्रत दर तत्वावर** (Per Copy Rate)" पुरविण्याबाबतचा करार करावा लागेल. कृषि व पदुम विभाग (खुद्द) करिता मशिनचा वेग किमान ४५ प्रत प्रती मिनट (४५ PPM) व मा.मंत्री कार्यालयाकरीता मशिनचा किमान वेग ३५ प्रत प्रती मिनट (३५ PPM) इतका असावा व मशिनवर A४, A३ व लिगल साईज पेपरच्या झेरॉक्स प्रती काढता आल्या पाहिजेत.

२. पुरवठा करण्यात आलेली झेरॉक्स मशिन ही पूर्णत: कार्यक्षम आधुनिक डिजीटल मशिन असावी व ती तीन वर्षापेक्षा जास्त जुनीही नसावी. (खरेदी वर्ष, ब्रॅन्ड, मॉडेल व यंत्र क्रमांक, यंत्राच्या सुविधेसह (specifications) नमूद करावे.)

३. पुरवठादारास शासकीय कार्यालयास झेरॉक्स मशिन भाडेतत्वावर देण्याचा किमान ५ वर्षांचा अनुभव असावा व त्यांनी त्या प्रत्येक वर्षात किमान ५ शासकीय कार्यालयांना झेरॉक्स मशिन भाडेतत्वावर दिलेली असावी. पुरवठादाराने शासकीय कार्यालयासोबत केलेल्या कराराची प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी. तसेच पुरवठादारास शासनाच्या कोणत्याही कार्यालयाने काळ्यायादीत टाकलेले नसावे.

४. मशिनच्या छपाईचा दर्जा उत्कृष्ट व टिकाऊ असणे आवश्यक आहे.

५. मशिनचे मासिक भाडे देण्यात येणार नसुन पुरवठादाराने प्रति प्रत दराने मशिन उपलब्ध करुन द्यावयाची आहे.
६. दर सर्व करांसहीत (Including GST) आहे किंवा नाही हे स्पष्टपणे नमूद करावे.
७. विभाग तसेच मा.मंत्री (कृषि) कार्यालयातर्फे फक्त मशिन ठेवण्यासाठी जागा, वीज, कागद व ऑपरेटर यांचा पुरवठा करण्यात येईल.
८. मशिनच्या टोनरचा खर्च, दुरुस्तीच्या भागासह खर्च व आवर्ती खर्च पुरवठादाराने करावयाचा आहे. त्याचे प्रदान विभागामार्फत केले जाणार नाही.
९. पुरवठा करण्यात येणाऱ्या झेरॉक्स मशिनव्दारे प्रति पृष्ठ झेरॉक्स काढण्यासाठी पूरवठादाराने निविदेत नमूद करण्यात आलेले (सर्व करासह) दर हे निविदा स्विकृती नंतर एक वर्षासाठी अस्तित्वात राहतील. सदर दरामध्ये झेरॉक्स मशीनची देखभाल दुरुस्ती, त्यासाठी लागणारे आवश्यक सुटे भाग, टोनर व इ.सर्व बाबींचा समावेश राहील.
१०. विभागास झेरॉक्स मशिनचा पुरवठा केल्यानंतर विभागाच्या कामाची गैरसोय होऊ न देण्याची हमी पुरवठादाराकडून देण्यात यावी. विभागाकडून / मा.मंत्री (कृषि) कार्यालयाकडून सदर दोन्ही मशिनच्या देखभाल-दुरुस्ती संदर्भात येणारा प्रत्येक फोनकॉल पुरवठाराकडून तातडीने स्विकारण्याची दक्षता घ्यावी किंवा काही कारणास्तव तो त्यावेळी घेऊ न शकल्यास पुढील अर्ध्या तासात पुरवठादाराकडून संबंधितांस रिटर्न कॉल करण्यात यावा.
११. मशीनच्या देखभाल/दुरुस्तीची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची असून कार्यालयीन कामकाजांच्या दिवसांमध्ये सदर झेरॉक्स मशिन बंद न राहू देण्याची व त्यामध्ये काही बिघाड झाल्यास पुढील कमाल ४ तासांच्या आत दुरुस्त करून देण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील. मशिन लवकर दुरुस्त होण्यासारखे नसल्यास पुरवठादाराकडून विभागास त्याऐवजी दुसरे कार्यरत मशिन त्वरित उपलब्ध करून देण्यात यावे. कामाच्या दिवसांमध्ये मशिन बंद राहिल्यास व ते तात्काळ दुरुस्त न केल्यास तेवढया बंद असलेल्या दिवसांचे भाडे मासिक सरासरीने कमी करण्यात येईल.
१२. कराराचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर पुढील करार अस्तित्वात येईपर्यंत पुरवठादाराला स्विकृत दराने झेरॉक्स मशिनचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.
१३. कराराची मुदत वाढविण्याबाबत शासनाचा निर्णय अंतीम राहील.
१४. झेरॉक्स मशीनवर काढलेल्या प्रतींचे मशिनवरील मिटर रिडींग संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांसमक्ष प्रत्येक महिन्याच्या एका ठराविक तारखेस (त्या तारखेस सुट्टी असल्यास त्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी) घेऊन ते विभागातील संबंधित अधिकाऱ्याकडून प्रमाणित करून लगतच्या महिन्यात सादर करण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील.
१५. भाडेतत्वावरील झेरॉक्स मशिन्सचे देयक प्रतिमहा विभागास सादर करावे. त्यानंतर प्रत्येकी मासिक किंवा द्वैमासिक देयके विभागाकडून अदा करण्यात येतील. देयकाची रक्कम स्विकारताना मुद्रांकीत पावती या विभागाच्या रोखशाखेस देणे बंधनकारक आहे. तथापि, प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास, विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.
१६. कृषि व पदुम विभाग व मा.मंत्री (कृषि) यांचे कार्यालयास प्रत्येकी एक झेरॉक्स मशिन **"प्रति प्रत दर तत्वावर** (Per Copy Rate)" पुरवठा करण्याच्या अनुषंगाने आपल्या संस्थेचे दरपत्रक व माहिती सोबत जोडलेल्या **प्रपत्र भाग-१ (तांत्रिक निविदा) आणि प्रपत्र भाग-२ (अतांत्रिक निविदा)** मध्ये भरून व तसा पाकीटांवर उल्लेख करून २ स्वतंत्र पाकीटे बनवून व ती दोन्ही पाकीटे एका मोहोरबंद

लिफाफ्यात (१ Sealed Envelope) घालून या विभागातील **"अवर सचिव (नोंदणीशाखा), कृषि व पदुम विभाग, रु.नं.५३०, ५ वा मजला, मंत्रालय विस्तार इमारत, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०००३२" यांचेकडे दिनांक ८ नोव्हेंबर, २०२१ पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये (सकाळी १०.०० ते दुपारी ४.३० पर्यंत)** पाठवावेत. त्यानंतर आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत.

१७. मोहोरबंद लिफाफ्यावर **"कृषि व पदुम विभागातील कार्यालयीन वापरासाठी झेरॉक्स मशीन भाडे तत्वावर पुरवठा करण्याबाबत निविदा"** असे लिहिणे आवश्यक आहे. या लिफाफ्यामध्ये भाग-१ "तांत्रिक" व भाग-२ "अतांत्रिक" असे दोन स्वतंत्र बंद लिफाफ्यांमध्ये (सोबत जोडलेल्या नमून्यांप्रमाणे) तशा उल्लेखासह ठेवावेत. अशा प्रकारे दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रके सादर करावे अन्यथा दरपत्रक ग्राह्य धरण्यात येणार नाही.

१८. प्राप्त निविदा उप सचिव (नोंदणीशाखा), कृषि व पदुम विभाग, ५ वा मजला, मंत्रालय विस्तार इमारत, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांचे दालनात उघडण्यात येतील. निविदा उघडतेवळी निविदाधारक स्वत: किंवा त्यांच्या एका प्रतिनिधीस उपस्थित राहण्याची मुभा राहील.

१९. उद्योग संचालनालय किंवा माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाचा दरकरार लागू करण्यात आल्यास निविदाधारकाबरोबर केलेला दरकरार संपुष्टात आणण्यात येईल.

२०. भाडे कराराच्या कालावधीमध्ये संबंधित पुरवठादार/संस्था यांचेकडून प्रस्तावित करण्यात आलेल्या सेवा कराराच्या अटी व शर्तीमध्ये शासनास असमाधानकारक सेवा प्रत्ययास आल्यास, म्हणजे कराराचे पालन समाधानकारकपणे न झाल्यास सेवा करार भंग करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.

२१. सदरहू सर्व अटी व्यक्तिश: (निविदा सादरकर्ता म्हणून) नीट वाचून व समजून घेऊन त्या मान्य असल्याचे नमूद करून त्यानंतरच निविदा (दरपत्रक) सादर करण्यात यावे.

२२. कोणतेही एक अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा, संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे किंवा दरपत्रक स्वीकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा तसेच दिलेले कार्यादेश रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवत आहे.

(अ.नि.साखरकर)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

---

**कृषि व पदुम विभाग (खुद्द) व मा.मंत्री (कृषि) यांच्या कार्यालयीन कामकाजाकरीता छायाप्रती काढण्यासाठी "प्रति प्रत दर तत्वावर" झेरॉक्स मशीन पुरवठा करणेबाबत निविदा**

**भाग-१: तांत्रिक दरपत्रक (फॉर्म-अ)**

१. पुरवठादाराचे / संस्थेचे नांव :________________

२. संपूर्ण पत्ता / कार्यालय :-________________

३. दूरध्वनी (कार्यालय) :- ________________

भ्रमणध्वनी क्रमांक :- ________________

ई-मेल :- ________________

४. निविदा प्रपत्र भरुन देण्याचा अंतिम दिनांक : ८ नोव्हेंबर, २०२१ रोजी दु.३.३० वाजेपर्यंत

५. आयकर नोंदणी क्रमांक (पॅन) : -________________

६. वस्तू व सेवा कर (GST) क्रमांक:- प्रमाणपत्र देणारे कार्यालय :- ________________

प्रमाणपत्राचा नोंदणी क्रमांक :- ________________

वैधतेची मुदत :- ________________

७. व्यवसाय चालविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या विविध नोंदण्या :- ________________

दुकाने व संस्था अधिनियम १९४८ : प्रमाणपत्र देणारे कार्यालय :- ________________

किंवा ई-उद्योग आधार प्रमाणपत्र : प्रमाणपत्राचा नोंदणी क्रमांक :- ________________

: वैधतेची मुदत :- ________________

८. आपल्या संस्थेने झेरॉक्स मशीन भाडेतत्वावर पुरविलेल्या शासकीय विभागाची / कार्यालयाची प्रमाणपत्रे / करार (५ वर्षाचा अनुभव व प्रती वर्षी किमान ५ कार्यालयांना झेरॉक्स मशीन पुरविल्याबाबत) सादर करावीत.

(कृ.मा.प)

९. कृषि व पदुम विभागात स्थापित करावयच्या आधुनिक डिजिटल झेरॉक्स मशीनचा तपशिल :

| | | |
|---|---|---|
| अ) | खरेदी वर्ष | :- |
| ब) | मॉडेल व यंत्र क्रमांक | :- |
| क) | एकेरी छायाप्रती काढण्याची प्रती मिनट क्षमता (PPM)<br>(Single side Xerox Per Minute) | :- |
| ड) | दुहेरी छायाप्रती काढण्याची प्रती मिनट क्षमता (PPM)<br>(Both side/ Duplex Xerox Per Minute) | :- |
| ई) | यंत्राच्या इतर सुविधा (Specification) | :- |

१०. मा.मंत्री (कृषि) यांचे मंत्रालयीन कार्यालय येथे स्थापित करावयच्या आधुनिक डिजिटल झेरॉक्स मशीनचा तपशिल :

| | | |
|---|---|---|
| अ. | खरेदी वर्ष | :- |
| ब. | मॉडेल व यंत्र क्रमांक | :- |
| क. | एकेरी छायाप्रती काढण्याची प्रती मिनट क्षमता (PPM)<br>(Single side Xerox Per Minute) | :- |
| ड. | दुहेरी छायाप्रती काढण्याची प्रती मिनट क्षमता (PPM)<br>(Both side/ Duplex Xerox Per Minute) | :- |
| ई. | यंत्राच्या इतर सुविधा (Specification) | :- |

११. दरपत्रकाच्या सूचनेमधील सर्व अटी व शर्ती मला मान्य असल्याबाबत व सदर पुरवठादार/ संस्था यांना कधीही काळ्या यादीत टाकले नसल्याबाबत पुरवठादाराच्या छापील लेटरहेडवर नमूद करुन त्यावर स्वाक्षरी व रबर शिक्का असणे आवश्यक आहे.

**दिनांक:-**

**स्थळ :-** **निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का**

(**सूचना**:- दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, ओव्हररायटींग (गिरवणे), पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी, तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.)

महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

---

**कृषि व पदुम विभाग (खुद्द) व मा.मंत्री (कृषि) यांच्या कार्यालयीन कामकाजाकरीता छायाप्रती काढण्यासाठी "प्रति प्रत दर तत्वावर" झेरॉक्स मशीन पुरवठा करणेबाबत निविदा**

**भाग-१: अतांत्रिक दरपत्रक (फॉर्म-ब)**

१. पुरवठादाराचे / संस्थेचे नांव :-____________________

२. संपूर्ण पत्ता / कार्यालय :-____________________

३. दूरध्वनी (कार्यालय) :-____________________

भ्रमणध्वनी क्रमांक :-____________________

४. ई-मेल :-____________________

५ कृषि व पदुम विभागात स्थापित करावयच्या आधुनिक डिजिटल झेरॉक्स मशीनचा तपशिल :-

| अ.क्र. | विवरण | तपशिल |
|---|---|---|
| १ | यंत्राचा प्रकार मॉडेल व यंत्र क्रमांक | |
| २ | यंत्र क्रमांक | |
| ३ | खरेदी वर्ष | |
| ४ | प्रती प्रत दर (फक्त पैसे मध्ये)<br>Single Page Rate<br>(सर्व प्रकाराच्या आकारचे पेपर करीता) | |
| ५ | GST दर | |

६. मा.मंत्री (कृषि) यांचे मंत्रालयीन कार्यालय येथे स्थापित करावयच्या आधुनिक डिजिटल झेरॉक्स मशीनचा तपशिल :

| अ.क्र. | विवरण | तपशिल |
|---|---|---|
| १ | यंत्राचा प्रकार मॉडेल व यंत्र क्रमांक | |
| २ | यंत्र क्रमांक | |
| ३ | खरेदी वर्ष | |
| ४ | प्रती प्रत दर (फक्त पैसे मध्ये)<br>Single Page Rate<br>(सर्व प्रकाराच्या आकारचे पेपर करीता) | |
| ५ | GST दर | |

**दिनांक:-**

**स्थळ :** **निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का**

(**सूचना**:- दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, ओव्हररायटींग (गिरवणे), पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी, तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.)

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

---

## कृषि व पदुम विभाग (खुद्द) व मा.मंत्री (कृषि) यांच्या कार्यालयीन कामकाजाकरीता छायाप्रती काढण्यासाठी "प्रति प्रत दर तत्वावर" झेरॉक्स मशीन पुरवठा करणेबाबत निविदा

### दरपत्रक व निविदेबाबतच्या कार्यक्रमाचा तपशिल

| अ.क्र. | तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | निविदा शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केल्याचा दिनांक | दि.२७.१०.२०२१ रोजी दुपारी ३.३० वा. |
| २ | दरपत्रक निविदा भरुन सादर करण्याचा / अंतिम दिनांक | दि.८.११.२०२१ रोजी दुपारी ३.३० वा |
| ३ | दरपत्रक निविदा सादर करण्याचा / कालावधी | एकूण १३ दिवस (सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन कामकाजाचे ७ दिवस) |
| ४ | दरपत्रक व मोहोरबंद निविदा सादर करण्याचे ठिकाण | उप सचिव (नोंदणीशाखा), कृषि व पदुम विभाग, रु.नं.५३०, ५ वा मजला, मंत्रालय विस्तार इमारत, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ |
| ५ | दरपत्रक निविदा उघडण्याचा दिनांक व / ठिकाण | दि.१०.१०.२०२१ रोजी दुपारी ३.४५ वा. उप सचिव (नोंदणीशाखा), यांचे दालन, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ |